स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाच्या

आंतर विद्याशाखे अंतर्गत ग्रंथालयशास्त्र विषयातील पीएच. डी. या पदवी करीता सादर केलेला शोध प्रबंध

डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांचे ग्रंथालय क्षेत्रात योगदान

संशोधक

चंद्रकांत गौतम नांगरे

M.Lib.& Inf.Sci.MH-SET

मार्गदर्शक

डॉ.घ.ना.पांचाळ

ग्रंथपाल

माधवराव पाटील महाविद्यालय,पालम

ता.पालम जि.परभणी

संशोधन केंद्र

माध्यम शास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मठरावाडा विद्यापीठ,नांदेड

डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांचे ग्रंथालय क्षेत्रात योगदान

प्रस्तावना :-

ग्रंथालय शास्त्राला विकसित करण्यासाठी निरनिराळया व्यक्तीचे योगदान मोलाचे ठरले आहे. ग्रंथालय शास्त्राचा विकास व्हावा म्हणून यासाठी सदैव कार्यरत राहणारी व्यक्ती म्हणून डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर सर्वत्र परिचित आहेत. ग्रंथालय शास्त्रात नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन ग्रंथालय अद्ययावत होतील या बाबत सदैव कार्यरत राहुन त्यासाठी मार्गदर्शन करणारी व्यक्ती म्हणजे डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर होय.

डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांनी ग्रंथालय संचालनालयाच्या विविध विभागातील कार्यालयामध्ये कनिष्ठ लिपिक, निर्गम सहाय्यक, तांत्रीक सहाय्यक, जिल्हा ग्रंथपाल, निरीक्षक, प्रभारी सहाय्यक आणि ग्रंथालय संचालक या पदावर काम केलेले आहे. तसेच त्यांचे ग्रंथालय शास्त्रावर अनेक ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. अनेक ग्रंथालय परिषेदा, कार्यशाळा, चर्चासत्रे, प्रशिक्षिण वर्ग, विविध संस्थाच्या कार्यकारिणीवर कार्य, विविध पुरस्कार मिळालेले आहेत. ग्रंथालय चळवळीत एक कार्यकर्ता म्हणून जे योगदान दिले आहेत. ग्रंथालय क्षेत्रात वेगवेगळया संस्थावर सक्रिय कार्य, विपुल प्रमाणात लेखन, वेगवेगळया चळवळीत सहभाग, अध्ययन, व्याख्याने अशा अनुभवी व्यक्तीचे कार्य विचारात घेता आजच्या काळात अशा व्यक्तीच्या कार्याचा आढावा घेणे आवश्यक ठरते. सरांच्या उत्तुंग व्यक्तीमत्वाची ओळख त्यांच्या जीवन चरित्राचे सर्व पैलु कळावे म्हणून प्रस्तुत संशोधन हाती घेतलेले आहे.

संशोधनाची गरज :-

गरज ही शोधाची जननी आहे. अमर्याद गरजा आणि मर्यादीत साधने यांचा मेळ घालण्याच्या दृष्टीकोणातुन करण्यात येणारे मानवी प्रयत्न हिच संशोधनाची आवश्यकता आणि गरज आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील एक नामवंत व्यक्तीमत्व म्हणून डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांचे नाव घेतले जाते. ग्रंथालय चळवळीतील एक सच्चा कार्यकर्ता जगासमोर यावा. त्यांच्या कार्याचा आगळा वेगळा ठसा समाजा समोर दिसावा. यासाठीच प्रस्तुत संशोधन होणे गरजेचे वाटत असल्यामुळे सदरील विषय अभ्यासासाठी घेण्यात आलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :-

(१) डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांचा प्रारंभीक जीवन व शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेणे.

(२) डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर लिखित ग्रंथाचा आढावा घेणे.

(३) डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांच्या ग्रंथालय चळवळीतील सहभाग अभ्यासणे.

(४) डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांच्या व्यक्तीमत्वाचा आढावा घेणे.

(५) त्यांनी त्यांच्या ग्रंथालयीन क्षेत्रातील सेवाकाळात केलेल्या विविध कामाची माहिती घेणे व उल्लेखनीय कामाचा अभ्यास करणे.

(६) डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान स्पष्ट करणे.

संशोधनाची गृहितके :-

अभ्यासकाच्या डोळयासमोर जी संशोधन समस्या असेल त्याचे एक संभाव्य उत्तर व स्पष्टीकरण म्हणून मांडण्यात आलेले विधान म्हणजे गृहितके. हिच गृहितके तयार करण्यासाठी त्या विषयाचे पुर्वज्ञान आधार म्हणून उपयोगी पडते. गृहितकामुळे अभ्यासकाचे लक्ष आपल्या विषयावर केंद्रीत होण्यास मदत होते. संशोधनासाठी गृहीत धरलेल्या गोष्टी गृहितकामध्ये सांगितल्या जातात. अर्थात गृहितके हे एक प्रकारचे अनुमान असतील या अनुमानाच्या आधारे वास्तविक तथ्ये गोळा केली जातात व त्याची पडताळणी केली जाते. प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी अभ्यासकाने पुढील गृहितकांची मांडणी केली आहे.

(१) डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांचे ग्रंथालय क्षेत्रात सक्रिय योगदान दिसून येते.

(२) डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांचे विपुल प्रमाणात लेखन आढळुन येते.

(३) डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांची महाराष्ट्राच्या ग्रंथालय चळवळीत महत्वाची भुमिका दिसून येते.

(४) डॉ.राजशेखर शंकरराव बालेकर यांचे व्यक्तीमत्व सर्वसमावेशक आहे असे आढळुन येते.

संशोधन पध्दती :-

संशोधन म्हणजे जे ज्ञात आहे, त्यामध्ये आणखी नविन किंवा ते अद्यापही अज्ञात आहे. ते शोधून काढण्यासाठीचे प्रयत्न होय. एखाद्या विषया संबंधीची समर्पक माहिती गोळा करण्यासाठी जे पध्दतशीर आणि शास्त्रशुध्द अन्वेषण केले जाते त्याला संशोधन म्हणतात. शास्त्रीय शोधाची कला म्हणजे संशोधन होय. संशोधन प्रक्रिया नियोजन पुर्वक हाती घ्यावयाचे कार्य आहे.

संशोधन पध्दतीची तर्कशुध्द विचार करण्याचे तंत्र म्हणून या तंत्राच्या आधारे समस्या सिमित केली जाते. समस्ये संबंधीची सर्व माहिती व वस्तुनिष्ठपणे गोळा केली जाते. ती संकलीत केली जाते आणि त्या माहितीच्या विश्लेषणानंतर संशोधक निष्कर्षा पर्यंत पोहचतो. संशोधनाच्या सुरूवातीला केलेल्या अनुमानाशी जर संशोधनाच्या शेवटी काढलेला निष्कर्ष जमला तर शाश्वत असा सिध्दांत किंवा सुत्र तयार होते. ही संशोधनाची प्रक्रिया आहे. प्रस्तुत विषयावरील संशोधनासाठी दोन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

वर्णात्मक संशोधन पध्दती :-

वर्णनात्मक संशोधन हे सद्यस्थितीत घडामोडी संदर्भात असते. वर्णनात्मक संशोधन म्हणजे घटनेच्या, समाजाच्या, सामाजीक, संस्थेच्या किंवा एखाद्या उपक्रमाच्या सद्यस्थितीचा सर्वंकष अभ्यास करुन प्रगतीचा आढावा घेतला जातो आणि विश्लेषनात्मक वर्णन केले जाते. त्यास वर्णनात्मक संशोधन म्हणतात.

ऐतिहासिक संशोधन पध्दती :-

ऐतिहासिक संशोधन पध्दतीमध्ये भुतकालीन घटनांचा विचार करण्यात येतो. आज घडणाऱ्या घटना आणि भुतकाळात घडलेल्या घटना यांच्यात काही कार्यकारण संबंध आहे का हे तपासण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येतो.

भुतकालीन गोष्टीबदल प्रेम असून चालत नाही, तर त्याचा वस्तुनिष्ठ अभ्यास करावा लागतो. सध्या निर्मीत गोष्टीना भुतकाळ कितपत कारणीभुत आहे याचा शोध घ्यावा लागतो.निस्पृह व कठोर भुमिकेतुन हे संशोधन केले जाते. यावरुनच तज्ञ लोक म्हणतात 'ऐतिहासिक संशोधन निदानात्मक संशोधन आहे' भूतकालीन घटनांचा आणि वर्तमान घटनांचा कार्यकारण संबंध आहे का यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो. यातुन सद्यस्थितीमध्ये घडणाऱ्या घटनांची पार्श्वभूमी कळते, त्याला ऐतिहासिक संशोधन पध्दती म्हणतात.

पी.व्ही.यंग यांच्या मते, "भुतकाळात ग्रंथालयीन शक्ती व प्रभावाने रुपांतरण घडवीत वर्तमानाला जो आकृतीबंध दिला त्या खास कारणीभुत ठरलेल्या घटनांचा शोध घेण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा उपयोग केला जातो"

व्याप्ती आणि मर्यादा :-

संशोधन विषयाचा विस्तार किंवा सर्व समावेशकता म्हणजे व्याप्ती होय. संशोधनाचे भौगोलिक, कालिक किंवा सांख्यिक आकारमान म्हणजे व्याप्ती होय. संशोधन कार्याच्या सीमा निश्चित करण्यासाठी त्या विषयाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट केली जाते. त्यामुळे अभ्यासाचे कार्यक्षेत्र व नमूना निश्चीत होतो. संशोधनातील ज्या घटकावर संशोधनाचे नियंत्रण नसते, तथापि ते घटक निष्कर्षावर मर्यादा घालतात. अशा घटकांची माहिती सांगणे म्हणजे संशोधनाच्या मर्यादा सांगणे होय.

अभ्यासकाने आपला संशोधन विषय निवडल्यानंतर त्याची काही मर्यादा घालून देणे आवश्यक असते. कारण सर्व समस्यांची शास्त्रीय पध्दतीने संशोधन करणे एका संशोधकासाठी कठीण काम आहे. त्यामुळे कोणत्या विषयावर संशोधन करण्याचे निश्चीत झाल्यानंतर संशोधकाला संशोधनाची व्याप्ती ठरवावी लागते. म्हणजे संशोधनाचा कालावधी आणि त्याचे कार्यक्षेत्र प्रथम निश्चित करणे आवश्यक असते.

प्रस्तुत संशोधन डॉ. राजशेखर शंकरराव बालेकर यांचे व्यक्तिमत्व विकास आणि ग्रंथालय क्षेत्रातील कार्यापूरतेच राहिल. त्यांच्या जन्मापासून ते आजतागायत जीवन कार्याचा समावेश सदरील संशोधनात करण्यात येईल.

प्रकरणाची रूपरेषा :-

१. प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात प्राश्वभूमी, संशोधनाची गरज, उद्दिष्टये, गृहितकृत्ये, संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा याचा अभ्यास करण्यात येईल.

२. **संशोधन पध्दती व संबंधित वाचनसाहित्याचा आढावा :**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन पध्दती व संशोधकाने अभ्यासलेल्या संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

३. **डॉ. राजशेखर शंकरराव बालेकर यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान :**

प्रस्तुत प्रकरणात डॉ. राजशेखर शंकरराव बालेकर यांनी दिलेल्या ग्रंथालय क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करण्यात येईल.

४. **माहिती संकलन, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन :**

प्रस्तुत प्रकरणात माहिती संकलित करून तिचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येईल.

५) **निष्कर्ष व शिफारशी :**

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचा अभ्यास करून निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात येतील.

अशा प्रकारच्या पाच प्रकरणांनी सदरील शोध प्रबंध पूर्ण करण्यात येईल. शेवटी संदर्भसूची, परिशिष्ट, छायाचित्र,वर्तमानपत्र कात्रण,विविध पत्रव्यवहार सन्मानित स्मृतीचिन्हे आणि डॉ. राजशेखर शंकरराव बालेकर यांची मुलाखत जोडण्यात येईल.

संदर्भ ग्रंथसूची :

१) बालेकर रा.शं. शासकिय विभागीय ग्रंथालय, ग्रंथायन

२) ढाकणे बा.नी. (२००५) ग्रंथालय साधक, ग्रंथालय व माहितीशास्त्र प्रबोधनी, औरंगाबाद.

३) शर्मा ज्यो.मू. (२००८) डॉ. दत्तात्रय देशपांडे व्यक्तीत्व आणि ग्रंथपालन क्षेत्रातील योगदान, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपुर.

४) कर्णिक प्रदिप (२००४) शंकर गणेश दाते : व्यक्ती आणि कार्य, ज्ञानगंगोत्री, त्रैमिाकस य.च.म.मु.वि.नाशिक.

५) सुतार ध.म. (२०११) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, ए.वि.एस. पब्लिकेशन्स, वाराणसी.

६) कायंदे पाटील (२००४) संशोधन पध्दती

७) निकोशे सत्यप्रकाश (२००७) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती, प्रज्ञा प्रकाशन, नागपुर.

८) नरगुंदे रेवती, ग्रंथालय आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे

९) रीसवडकर म.रा. (२००९) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन व्याख्या आणि पध्दती, य.च.म.मु.वि. नाशिक

संधोधक **मार्गदर्शक**

संमती पत्रक

दिनांक : / /

प्रती,
मा. उपकुल सचिव
पदव्युत्तर विभाग,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

विषय :- संशोधन मार्गदर्शक संमती बाबत

संदर्भ :- प्रस्तुत विद्यापीठ दि.११/११/२०१७ RAC चे Certificate of Allocation.

महोदय,

वरील विषय आणि संदर्भिय पत्रान्वये संशोधक विद्यार्थी **चंद्रकांत गौतम नांगरे** यांना पीएच.डी. पदवीचे संशोधन कार्य करण्यासाठी मार्गदर्शन करावे अशा सुचना देण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने संशोधन कार्यासाठी संशोधकाने **"डॉ. राजशेखर शंकरराव बालेकर यांचे ग्रंथालय क्षेत्रात योगदान "** हा विषय संशोधनासाठी निवडला असून या विषयाचा संशोधन आराखडा तयार केला असुन प्रस्तुत शोध कार्यासाठी मार्गदर्शन करण्यास या पत्राद्वारे संमती देण्यात येत आहे.

मार्गदर्शक

डॉ. घ.ना.पांचाळ
ग्रंथपाल
माधवराव पाटील महाविद्यालय,पालम
ता.पालम, जि.परभणी.

संमती पत्रक

दिनांक :

प्रती,
मा. उपकुल सचिव
पदव्युत्तर विभाग,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

विषय :- पीएच. डी. संशोधन आराखडा स्विकारणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून अर्ज सादर करण्यात येतो की, **चंद्रकांत गौतम नांगरे** प्रस्तुत विद्यापीठात दि.११/११/२०१७ झालेल्या RAC नुसार डॉ. घ. ना. पांचाळ हे माझे संशोधन मार्गदर्शक असुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली **"डॉ. राजशेखर शंकरराव बालेकर यांचे ग्रंथालय क्षेत्रात योगदान "** या संशोधन विषयाची निवड करून सदर विषयाचा संशोधन आराखडा तयार केला आहे.

तरी माझा संशोधन आराखडा स्विकारण्यात यावा ही विनंती.

संशोधक

मार्गदर्शक

चंद्रकांत गौतम नांगरे
ग्रंथपाल
पोदार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली

डॉ. घ. ना. पांचाळ
ग्रंथपाल
माधवराव पाटील महाविद्यालय,
पालम ता.पालम जि.परभणी